आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाची मुंबईत राजकीय पक्ष आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा

- केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या पर्यटन ग्राम पुरस्कारांमधे रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार जाहीर

- संसदेच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू विषयक समितीच्या अध्यक्षपदी सुनील तटकरे, तर ऊर्जा समितीच्या अध्यक्षपदी श्रीरंग बारणे यांची नियुक्ती

- भारत-बांगलादेश कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे खंडित /बांगलादेशाच्या ३ बाद १०७ धावा

**आणि**

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं निधन

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगानं आज मुंबईत विविध बैठका घेतल्या. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयोगाच्या पथकानं आज सकाळी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरच्या पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. त्यानंतर राज्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी निवडणूक आयोगानं चर्चा केली. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह खात्याचे अतिरीक्त मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

त्यानंतर निवडणूक आयोगानं कोकण आणि पुण्याचे विभागीय आयुक्त, कोकण परिक्षेत्राचे महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक यांच्यासोबत निवडणूक तयारीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि इतर राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या प्रलंबित बदल्या करण्यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगानं आज राज्याच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे निर्देश दिले. यासंदर्भात संबंधित विभागांचे आणि कार्यालयांचे अनुपालन अहवाल तत्काळ सादर करण्याच्या सूचना आयोगानं दिल्या आहेत. ३१ जुलै २०२४ रोजी मुख्य सचिवांना आणि पोलीस महासंचालकांना अहवाल सादर करण्याचे निर्देश पत्राद्वारे दिले होते. त्यानंतर आजतागायत तीन स्मरणपत्रं देऊनही कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही, असं या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना पदावरुन तात्काळ हटवावं अशी विनंती प्रदेश काँग्रेसनं निवडणूक आयोगाकडे केली आहे. रश्मी शुक्ला यांची सेवानिवृत्ती ३० जून २०२४ ला होणार असताना त्यांना बेकायदेशीररित्या जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, विरोधी पक्षनेत्यांचे दूरध्वनी बेकायदेशीररित्या टॅप करण्याच्या प्रकरणात त्यांच्यावर आरोप आहेत, त्यांची कार्यक्षमता आणि निःपक्षपातीपणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत, या पार्श्वभूमीवर राज्यात विधानसभेच्या आगामी निवडणुका मुक्त वातावरणात पार पडण्याच्या दृष्टीनं, त्यांना पदावरुन हटवावं, असं प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय पर्यटन मंत्रालयातर्फे देण्यात येणारे पर्यटन ग्राम पुरस्कार जाहीर झाले असून त्यात कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला मिळाला आहे. या स्पर्धेत ३० राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधून एकूण ९९१ गावांनी भाग घेतला होता. साहस, कृषी,सामुदायिक जीवन, हस्तकला, वारसा,पर्यावरणाप्रति जबाबदारी, आध्यात्मिक आणि आरोग्य पर्यटन, तसंच विशेष लक्षवेधी आकर्षक पर्यटन अशा ८ विभागांमधे मिळून देशभरातल्या ३६ खेड्यांना हा पुरस्कार देण्यात आला. नैसर्गिक साधन संपत्तीचा सुयोग्य वापर, सांस्कृतिक वारशाचं जतन, पारंपरिक मूल्यांचं जतन आणि शाश्वतता या निकषांवर ही निवड झाल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

जागतिक पर्यटन दिनाचं औचित्य साधून वेरुळ इथल्या राष्ट्रकूट पर्यटक निवासाचं उद्घाटन आज झालं. पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी मुंबईहून दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

संसदेच्या आर्थिक विषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भर्तृहरी महताब यांची तर परराष्ट्र व्यवहार विषयक समितीच्या अध्यक्षपदी शशी थरूर यांची नेमणूक झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री राधा मोहन सिंग हे संरक्षण विषयक तर राधा मोहन दास अग्रवाल गृहविषयक समितीचे अध्यक्ष राहणार आहेेत. सुनील तटकरे यांची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, श्रीरंग बारणे यांची ऊर्जा विषयक समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली आहे. याशिवाय इतरही अनेक समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याचा खेळ आज पावसामुळं थांबवावा लागला. सकाळी कानपूरच्या ग्रीन पार्क

स्टेडियमवर हा सामना सुरू झाला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. ३५ षटकात बांग्लादेशानं संघ ३ गडी बाद १०७ धावा केल्यानंतर खेळ थांबला. त्यानंतर पुन्हा खेळ सुरु होऊ शकला नाही.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ  नेते आणि माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं आज पहाटे धुळे इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. उद्या त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

रोहिदास पाटील यांनी सन १९७२ मध्ये धुळे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून पहिल्यांदा निवडून येत राजकारणात प्रवेश केला. १९८० मध्ये तत्कालीन कुसुंबा आणि आताच्या धुळे ग्रामीण विधान सभा मतदारसंघात आमदार म्हणून ते निवडून आले आणि त्यानंतर सलग ६ वेळा त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. १९८६ ते १९८८ या कालावधीत ते महसूल राज्यमंत्री होते. त्यानंतर त्यांनी कृषी आणि फलोत्पादन मंत्री, ग्रामविकास, पाटबंधारे तसंच रोजगार हमी, गृहनिर्माण, संसदीय कार्य अशा विविध खात्यांचं मंत्रीपद भूषवलं. त्यांच्या कारकिर्दीत धुळे जिल्ह्यातले अक्कलपाडा आणि इतर प्रकल्प पूर्ण झाले.

रोहीदास पाटील यांच्या निधनाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जन खरगे, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार वर्षा गायकवाड अशा मान्यवरांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

'स्वच्छता ही सेवा' अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. या अभियानात काम करताना वेगळं समाधान मिळत असल्याचं अहमदनगरमधे या अभियानात सहभागी झालेले अरविंद धोंगडे यांनी सांगितलं...

**होल्ड --- बाईट...अरविंद धोंगडे (१५ सेकंद)**

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**<><><><><>**

राज्यातल्या विविध धरणांमधे सध्या ८८ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा आहे. **मुंबईच्या** अनेक भागांत आज सकाळी जोरदार पाऊस झाला. हवामान विभागानं आज **मुंबई**, **पालघर, रायगड आणि उत्तर महाराष्ट्र या जिल्ह्यांना** ऑरेंज अलर्ट दिला आहे. **नवी मुंबई** परिसरात आज सकाळपासून पावसाची संततधार सुरू होती. **दक्षिण महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या** काही भागातही आज जोरदार पाऊस होऊ शकतो, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**नाशिक** मधल्या धरणांमधला पाणीसाठा वाढला असून **गंगापूर** धरणासह १३ धरणांमधून पुन्हा पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. या पावसामुळे ग्रामीण भागात घरांची पडझड झाली आहे.

**लातूरमध्ये** मांजरा धरणातून पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. तर **लातूर-धाराशिव** सीमेवरच्या  तेरणा नदीपात्रातला विसर्ग कमी करण्यात आला असून सध्या २ हजार २९० क्यूसेक इतका सुरू आहे.

**धाराशीव** जिल्ह्यातल्या परंडा तालुक्यातल्या सीना कोळेगाव धरण शंभर टक्के भरलं आहे.  या धरणाचे एकूण १७ दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सुरू केला आहे. त्यामुळे प्रकल्प परिसर आणि नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**